महाराष्ट्र शासन
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

दूरध्वनी क्र. ०२२ २७५६०१४५
इ-मेल - cadreexam2023@gmail.com
Website: https://mahadma.maharashtra.gov.in

७ वा मजला, बेलापूर भवन, सी.बी.डी. बेलापूर,
रेल्वे स्टेशन जवळ (पु) नवी मुंबई-४००६१४.

नपप्रसं/संवर्ग कर्मचारी/ अनुकंपा परिपत्रक/कक्ष-३ / ६११२ दिनांक. 14 AUG 2025

महाराष्ट्र नगरपरिषद राज्यसेवा (गट-क) श्रेणी-अ, श्रेणी-ब व श्रेणी-क या संवर्गातील कार्यरत दिवंगत कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावरील नियुक्ती देणे बाबत मानक कार्यप्रणाली.

## परिपत्रक

वाचा:-
१. नगरपरिषद प्रशासन संचालनालय परिपत्रक क्र.नपप्रसं२०१८/प्र.क्र.५८/कक्ष - ३/४११६, दि.२२.१०.२०१८
२. नगरपरिषद प्रशासन संचालनालय परिपत्रक क्र.नपप्रसं/२०२१/संवर्ग कर्मचारी/अनुकंपा परिपत्रक /कक्ष -३ /२२६५, दि.०६.०७.२०२१.
३. सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.अकंपा -१२२१/प्र.क्र.१८६/का-८, दि.२६.०८.२०२१.
४. नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्र.एमसीओ-२०२४/प्र.क्र.३३१/नवि-१४, दि.०७.०७.२०२५.
५. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.अकंपा-१२२५/प्र.क्र.१२१/म.लो.आ, दि.१७.०७.२०२५.

## -: प्रस्तावना :-

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ७५ मधील तरतुदीनुसार विविध संवर्गासाठी महाराष्ट्र नगरपरिषद राज्यसेवा(गट क), श्रेणी-अ, श्रेणी-ब व श्रेणी-क गठीत करण्यात आले आहेत. सदर सेवांकरिता नियुक्ती प्राधिकारी हे आयुक्त तथा

Scanned with OKEN Scanner

संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई आहेत. सदर सेवेतील नियुक्त कर्मचारी हे राज्य शासकीय कर्मचारी सबब या सेवांतील कर्मचारी यांना इतर राज्य शासकीय कर्मचारी यांचे प्रमाणेच अनुकंपा योजना लागू असून त्याबाबत संदर्भ क्र १ वरील परिपत्रक तसेच संदर्भ क्र.२ अन्वये मानक कार्यपद्धती बाबत परिपत्रक या कार्यालयाकडून या पूर्वीच निर्गमित करणेत आली आहेत व त्याप्रमाणे कार्यवाही करून पात्र वारसांना नियुक्ती देण्यात येत होती.

मात्र, महाराष्ट्र नगरपरिषद राज्यसेवा (गट-क) श्रेणी-अ, श्रेणी-ब व श्रेणी-क या सर्व संवर्गातील कार्यरत दिवंगत कर्मचाऱ्यांच्या वारसास राज्य संवर्गातील गट-क, श्रेणी-क मधील सातव्या वेतन आयोगानुसार S-१३-३५४००-११२४००, S-१०-२९२००-९२३०० या निम्नश्रेणीमधील पदावर नियुक्ती द्यावी अगर नगरपरिषदा/नगरपंचायतीच्या आस्थापनेवर राज्य संवर्गाव्यतिरिक्त लिपिक, किंवा इतर तत्सम पदे ज्यांची वेतनश्रेणी सहाव्या वेतन आयोगानुसार ५२००-२०२०० ग्रेड वेतन १९००, सातव्या वेतन आयोगानुसार S-६, १९९००-६३२०० किंवा त्याखालील वेतनश्रेणीमध्ये द्यावी याबाबत नगरपरिषद प्रशासन संचालनालय स्तरावरून मार्गदर्शन मिळणेबाबतचा प्रस्ताव आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई यांनी दि.16.02.2024 रोजीचा पत्रान्वये शासनास सादर केला होता.

नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांच्याकडील मार्गदर्शन मागणी प्रस्ताव व सदर प्रकरणी सामान्य प्रशासन विभागाचा अभिप्राय विचारात घेता नगरपरिषद राज्यस्तरीय संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियास अनुकंपा नियुक्तीबाबत संदर्भ क्र.४ वरील शासन परिपत्रक, नगरविकास विभागामार्फत निर्गमित करण्यात आले आहे. सदर परिपत्रकात सदर कर्मचाऱ्यांच्या वारसास राज्य संवर्गाव्यतिरिक्त नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील लिपिक, वेतनश्रेणी सहाव्या वेतन आयोगानुसार ५२००-२०२०० ग्रेड वेतन १९०० (सातव्या वेतन आयोगानुसार S-६, रू.१९९००-६३२००) या वेतनश्रेणीमध्ये देण्यात यावी व त्याची कार्यपद्धती संदर्भ क्र.३ वरील परिपत्रकान्वये निश्चित करावी असे नमूद आहे.

मात्र संदर्भ क्र.५ वरील शासन निर्णयान्वये अनुकंपा संबंधित सन १९९४ पासून वेळोवेळी निर्गमित एकूण ४५ आदेश अधिक्रमित करण्यात आले असून, संदर्भीय शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेले सर्वसमावेशक सुधारीत धोरणांतर्गत कार्यवाही करावी असे नमूद आहे.

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र नगरपरिषद राज्यसेवा संवर्ग कर्मचारी हे जरी राज्य शासकीय कर्मचारी असले तरी त्यांची पदस्थापना ही राज्यातील विविध नगरपरिषदा व नगरपंचायती येथे होत असते. नगरपरिषदा, नगरपंचायती यांचे स्वतंत्र कायदेशीर अस्तित्व असून नियुक्ती, ठराव व उपविधी करून कार्यवाही करणेचे अधिकार त्यांना आहेत. सबब, दिवंगत कार्यरत महाराष्ट्र नगरपरिषद राज्यसेवा संवर्ग कर्मचारी यांचे पात्र वारस यांना नियुक्ती देणे बाबत कोणताही क्लिष्टता अथवा संभ्रम राहू नये या उद्देशाने, संदर्भ क्र.५ वरील शासन निर्णयाशी सुसंगत असे परिपत्रक निर्गमित करणे संचालनालयाच्या विचाराधीन होते.

-: परिपत्रक :-

१. महाराष्ट्र नगरपरिषद राज्यस्तरीय संवर्गातील दिवंगत कर्मचा-यांच्या वारसास पात्रतेनुसार नगरपरिषद आस्थापने वरील गट-क मधील लिपिक अथवा गट- ड मधील सरळसेवेने भरती अनुज्ञेय असलेल्या पदावर करता येईल.

२. संदर्भ क्र. ५ मध्ये नमूद प्रमाणे या पुढे नगरपरिषद संचालनालय स्तरावर गट-क अथवा गट ड ची प्रतिक्षासूची ठेवण्यात येणार नाही. तसेच आतापर्यंत ठेवण्यात आलेली प्रतिक्षासूची निष्क्रिय होईल. तरी या पुढे अनुकंपा नियुक्ती बाबतचे कोणतेही प्रस्ताव, अर्ज संचालनालयाकडे सादर करणेत येऊ नये.

३. राज्यस्तरीय संवर्गातील दिवंगत कर्मचारी मृत्यू समयी ज्या नगरपरिषद /नगरपंचायती मध्ये कार्यरत होता, त्या नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी ह्यांनी कार्यालय प्रमुख या नात्याने सादर कर्मचाऱ्यांच्या वारसांना/कुटुंबियांना अनुकंपा योजनेची माहिती देणे, संदर्भीय शासन निर्णयात नमूद प्रमाणे परिशिष्ट ब मध्ये इच्छुक्ता पत्र भरून घेणे व परिशिष्ट क मधील परिपूर्ण अर्जाचा नमुना देणे इ. बाबतची कार्यवाही करावी व त्याची पोचपावती घ्यावी.

४. इच्छुक्ता यादी ठेवणे, प्राप्त परिपूर्ण अर्जाची करून गट निश्चित करणे, विहित मुदतीत परिपूर्ण अर्ज प्राप्त न झाल्यास करावयाची कार्यवाही याबाबत संदर्भीय शासन निर्णयात नमूद प्रमाणे कार्यालय प्रमुख या नात्याने संबंधित नगरपरिषद/नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी यांनी कार्यवाही करावी.

५. मुद्दा क्र. ४ मधील नमूद कार्यवाही करून गट-क साठीचे पात्र प्राप्त परिपूर्ण प्रस्ताव मुख्याधिकारी यांनी जिल्हा सह आयुक्त, यांच्या मार्फत जिल्हाधिकारी कार्यालय यांच्याकडे सादर

Scanned with OKEN Scanner

करावी. जिल्हा सह आयुक्त यांनी मुख्याधिकारी यांना परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून संबंधीत उमेदवाराचे नाव जिल्हास्तरीय प्रतिक्षासूचित समाविष्ट करणे बाबत जिल्हाधिकारी यांना सूचित करावे. उमेदवार गट -ड च्या नियुक्तीस पात्र असल्याचे निश्चित झाल्यास नियुक्ती प्राधिकारी म्हणून मुख्याधिकारी यांनी कार्यालयीन स्तरावरील प्रतिक्षासूचित परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्याच्या दिनांकास उमेदवाराचे नाव समाविष्ट करावे.

६. परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्याचा दिनांकावर उमेदवाराचे प्रतिक्षासुचीतील स्थान निश्चित होणार असल्याने प्रस्ताव स्वीकारतेवेळी मुख्याधिकारी यांनी अत्याधिक दक्षता घ्यावी. तसेच आवश्यक सर्व बाबींची पूर्तता करूनच प्रस्ताव स्वीकारावेत.

७. गट-क च्या नियुक्तीसाठी पात्र असलेल्या उमेदवाराचे प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करणे बाबत तसेच गट-ड च्या नियुक्ती साठी पात्र असलेल्या उमेदवारांचे प्रस्ताव प्राप्त करून नियुक्ती देण्यास नाहक विलंब होणार नाही या अनुषंगाने जिल्हा सह आयुक्त यांनी दर माह अनुकंपा प्रकरणांच्या (गट-क व गट-ड) सद्यस्थिती बाबत आढावा घ्यावा व आवश्यक सूचना निर्गमित करून परिपूर्ण प्रस्ताव जिल्हाधिकारी स्तरावरील प्रतिक्षासूचित समाविष्ट करणेसाठी प्राप्त करून घ्यावेत तसेच केवळ संदर्भीय शासन निर्णयात स्पष्ट नमूद नसलेल्या अथवा परिपत्रकात नमूद नसलेल्या बाबीं संदर्भातच या कार्यालयाकडे संदर्भ करावा. अन्य प्रकरणी जिल्हा सह आयुक्त यांनी आपल्या स्तरावरून नियमोचीत कार्यवाही करावी.

८. गट-ड साठीची प्रतिक्षासूची मुख्याधिकारी यांनी नगरपरिषद, नगरपंचायतींच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी.

९. उमेदवाराच्या विनंतीनुसार प्रतिक्षासूचीचा गट बदलणे अथवा प्रतिक्षासूचीतील नाव बदलणे, बाबतची कार्यवाही संदर्भ क्र. ५ वरील शासन निर्णयातील नुसार आवश्यकतेनुसार नियुक्ती प्राधिकारी म्हणून मुख्याधिकारी यांनी करावी.

१०. गट क च्या पदावर प्रतिक्षासूचीतील उमेदवारास नियुक्तीसाठी उपलब्ध रिक्त पदांची गणना संदर्भ क्र. ५ वरील शासन निर्णयातील तरतुदीनुसार करून त्याची माहिती सर्व मुख्याधिकारी यांनी नमूद 'परिशिष्ट —फ' मध्ये जिल्हा सह आयुक्त यांना उपलब्ध करून द्यावी.

Scanned with OKEN Scanner

११. जिल्हा सह आयुक्त यांनी प्रतिक्षासूचित समाविष्ट उमेदवारांना जिल्ह्यातील कोणत्या नगरपरिषदेमध्ये नियुक्ती हवी आहे या बाबतचा लेखी पसंतीक्रम घेऊन जिल्हाधिकारी यांचे कडे सादर करावा.

१२. जिल्हाधिकारी कार्यालयाने शिफारस केलेल्या उमेदवारास मुख्याधिकारी यांनी सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने नियुक्ती आदेश निर्गमित करावेत व त्याची एक प्रत कार्यालयास पाठवावी.

१३. गट-ड च्या पदावर अनुकंपा नियुक्ती देणे करीता आवश्यकतेनुसार नगरपरिषद आस्थापनेवरील मृत पदे पुनर्जीवित करणे बाबत प्रस्ताव विहित मार्गाने नगरपरिषद प्रशासन संचालनालयास सादर करावा. अन्य प्रकरणी पद उपलब्धतेनुसार मुख्याधिकारी यांनी सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने नियुक्ती आदेश निर्गमित करावेत व त्याची एक प्रत कार्यालयास पाठवावी.

१४. जिल्हा सह आयुक्त यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व नगरपरिषद, नगरपंचायत यांचेकडील अनुकंपा प्रकरणांच्या (गट-क व गट-ड) सद्यस्थितीचा आढावा घेऊन त्याबाबतचा सहामाही अहवाल संदर्भीय शासन निर्णय क्र. ५ मधील "परिशिष्ट ह" नुसार इकडील कार्यालयास सादर करावा.

१५. सदर परिपत्रकात नमूद नसलेल्या बाबीबाबत संदर्भ क्र. ५ वरील शासन निर्णयात नमूद तरतुदींनुसार कार्यवाही करावी.

(अभिषेक कृष्णा,भा.प्र.से)

आयुक्त तथा संचालक,

नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई

प्रति,

१. विभागीय आयुक्त, नगरपरिषद प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय,(सर्व)

२. जिल्हाधिकारी, सर्व जिल्हे.

३. जिल्हा सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, (सर्व)

४. मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत (सर्व)

Scanned with OKEN Scanner